॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

दीपावली पाडवा
निमित्त शुभेच्छा!

अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

सुट्टीची सुचना

दीपावली पाडवा व भाऊबीज निमित्त दि. १० व ११ नोव्हेंबर २०२६ रोजी वीरभूमी कार्यालयास सुटी असल्याने दि. ११ व दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचे अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहीरातदार, प्रतिनिधी, हितचिंतक, एजंट यांनी नोंद घ्यावी. – संपादक

SPOT NEWS

उसाला प्रतिटन ४००० रुपये दरासाठी राहुरी रास्ता रोको

● **राहुरी** – साखर कारखान्याकडून गाळप हंगाम सुरू होऊन एक महिना उलटला, तरी बहुतांश साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर केला नाही. त्यामुळे उसाला प्रतिटन ४००० रुपये पहिली उचल मिळावी, या मागणीसाठी सोमवारी राहुरी येथे कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर नगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गावर शेतकऱ्यांनी सकाळपासून ठिय्या मांडून रास्ता रोको आंदोलन केले. रात्री उशिरापर्यंत हे आंदोलन सुरू होते. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. साखर, इथेनॉल, वीज निर्मिती, मळी आणि बगॅस यासारख्या उपपदार्थांतून कारखान्यांना उत्पन्न मिळते. ते त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर देणे शक्य आहे.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची गुरुवारी निवड

अध्यक्ष, उपाध्यक्ष पदावर कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता । फैसला मुख्यमंत्री फडणवीस घेणार?

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची निवड गुरुवारी होणार आहे. निवडीसाठी बँकेच्या सभागृहात सकाळी ११ वाजता जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विखे-थोरात गटाच्या सहकार विकास आघाडीला स्पष्ट बहुमत असल्याने या मंडळाचाच अध्यक्ष व उपाध्यक्ष होणार हे निश्चित आहे.

जिल्हा बँकेचा अध्यक्ष निवडीचा फैसला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असल्याचे या अगोदरच माजी खा. सुजय विखे पाटील यांनी जाहीर करण्यात आले आहे. मात्र अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.

जिल्हा बँकेच्या नुकत्याच झालेल्या २१ संचालक मंडळाच्या निवडणुकीत पालकमंत्री मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजीमंत्री बाळासाहेब थोरात आणि शंकरराव गडाख यांच्या सहकार विकास आघाडीकडे अपक्ष निवडून आलेल्या संजीवनी शिंदे यांच्यासह १८ जागा आहेत. विधानपरिषद सभापती राम शिंदे यांच्याकडे दोन तर विरोधी लंके-लोखंडे यांच्या सहकार परिवर्तन आघाडीला एक अशा जागा मिळाल्या आहेत. सहकार विकास आघाडीला १८ जागा मिळाल्याने अध्यक्ष व उपाध्यक्ष बिनिवरोध होण्याचा कयास आहे. अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागते? अध्यक्षपदासाठी विखे-थोरात यांच्यात अडीच-अडीच वर्षाचा फॉर्म्युला ठरण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे पहिले अडीच वर्ष कोणाचा अध्यक्ष होणार याची चर्चा आहे. मात्र अध्यक्ष पदाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असल्याने पहिले अडील वर्ष भाजपाच अध्यक्ष होण्याची शक्यता आहे.

अध्यक्षपदासाठी माजी खा. सुजय विखे पाटील, आ. मोनिकाताई राजळे, रणजित देशमुख, शंकरराव गडाख, बिपीन कोल्हे, राजश्रीताई घुले, अनुराधा नागवडे यांच्यापैकी कोणाची वर्णी लागते याकडे लक्ष लागून राहिले आहे. उपाध्यक्षपदासाठी यातूनच एकाची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

अध्यक्ष, उपाध्यक्षपदाच्या निवडीच्या पार्श्वभूमिवर नुकतीच पालकमंत्री राधाकृष्ण



विखे पाटील यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांची चौंडी येथे जावून भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी एकत्रिपणे पक्षासाठी काम करण्यावर एकमत झाले. दरम्यान अध्यक्षपदाच्या निवडणुकीत वेगळा विचार न करता सहकार विकास आघाडीच्या बाजुने राहण्यावर चर्चा झाल्याचे समजते. बँकेच्या निवडणुकीत विरोधी सहकार परिवर्तन आघाडीचे एकमेव उमेदवार खा. निलेश लंके हे निवडून आलेले असल्याने अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ते शिंदे गटाच्या दोन संचालकांच्या मदतीने काही खेळी खेळतील यामुळे विखे यांनी शिंदे यांची भेट घेवून चर्चा केल्याची माहिती आहे. तर खा. निलेश लंके यांनी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची संगमनेरमध्ये भेट घेतली. यामुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र अध्यक्षपदाचा काय निर्णय होतो हे गुरुवारी स्पष्ट होणार असल्याने याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.

महिलांनाही मिळणार संधी!

■ या पंचवार्षिक निवडणुकीत बँकेत सहा महिला सदस्या संचालक म्हणुन काम पहाणार आहेत. प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात बँकेचा कारभार पाहण्यासाठी महिलांना संधी प्राप्त झाली आहे. तसेच संचालक म्हणुन निवडून आलेल्या महिलांनी आपआपल्या क्षेत्रात भरिव अशी कामगिरी केलेली आहे. तसेच अध्यक्षाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असल्याने लाडक्या बहिणींना संधी देतात का, याकडे लक्ष लागून आहे. संचालक म्हणुन राजश्रीताई घुले, आ. मोनिकाताई राजळे, अनुराधा नागवडे, संगीता वाघ, ज्योती शिंदे, संजीवनी शिंदे या निवडून आलेल्या आहेत.

गोकुळच्या अध्यक्षपदाची आज निवड

● **कोल्हापूर । वीरभूमी** –

गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीची उत्सुकता आता टोकाला पोहोचली आहे. काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांनी गोकुळ अध्यक्ष निवडणुकीच्या आधी आपली भूमिका जाहीर केली आहे.महाराष्ट्रातील जनतेने काल रस्त्यावर उतरून आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचा पूर्ण सन्मान राखत गोकुळच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणार आहोत, असे सतेज पाटील यांनी स्पष्ट केले. तसेच, आमचे सर्व संचालक आजच्या बैठकीला उपस्थित राहणार असून कार्यकर्त्यांनी पूर्ण शांतता राखावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. २४ तारखेला यासंदर्भातील पुढील रणनीती जाहीर केली जाईल, असेही ते म्हणाले.

शशिकांत पाटील विरुद्ध रणजितसिंह पाटील; अध्यक्षपदासाठी थेट सामना

गोकुळच्या अध्यक्षपदासाठी आज सकाळी ११ वाजता मतदान प्रक्रिया होणार आहे. समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील-चुयेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महायुतीकडून रणजितसिंह पाटील यांचे नाव पुढे करण्यात आले आहे. त्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडीत दोन्ही गटांमध्ये थेट सामना रंगणार आहे.

गोकुळच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या होत्या. तर महायुती समर्थित पॅनेलला १२ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे निवडून आलेल्या संचालकांच्या संख्येनुसार समविचारी आघाडीचे पारडे जड होते. मात्र, अध्यक्ष निवडीच्या गणपूर्तीचा मुद्दा आणि शासननियुक्त संचालकांच्या मतदानाच्या अधिकारामुळे राजकीय समीकरणे बदलली आहेत.

ऐन दिवाळीच्या दिवशीच धाराशिवमध्ये भीषण आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

● **धाराशिव । वीरभूमी** –

दिवाळीच्या आनंदावर धाराशिव जिल्ह्यातील येडशी गावात भीषण दुर्घटनेने विरजण घातले आहे. किराणा दुकानाच्या वरच्या मजल्यावर राहणाऱ्या करंडे कुटुंबाच्या घराला मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक व्यक्ती बचावली आहे. घरात सर्वजण झोपेत असताना आग लागल्याने धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळांमुळे त्यांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. या घटनेमुळे येडशी गावासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

धाराशिव तालुक्यातील येडशी येथे गोविंद करंडे यांचे किराणा दुकान आणि त्याच इमारतीच्या वरच्या मजल्यावर त्यांचे कुटुंब वास्तव्यास होते. सोमवारी (९ नोव्हेंबर) मध्यरात्री सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास या इमारतीला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. तळमजल्यावरील दुकानातील किराणा साहित्य आणि इतर वस्तूंमुळे आग वेगाने पसरल्याची प्राथमिक माहिती आहे. घरातील सदस्य गाढ झोपेत असल्याने आग लागल्याचे लक्षात येईपर्यंत परिस्थिती गंभीर झाली होती. आगीचे लोट आणि धुरामुळे वरच्या मजल्यावरील कुटुंबाला बाहेर पडणे कठीण झाले ज्यामध्ये एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी अंत झाला.

या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला असून मृतांमध्ये उत्तम त्रिंबक करंडे, चंद्रकला उत्तम करंडे, गोविंद उत्तम करंडे, ज्योती गोविंद करंडे, गायत्री गोविंद करंडे आणि सिद्धी गोविंद करंडे यांचा समावेश असल्याची माहिती मिळाली आहे.



वीरभूमी

SPOT NEWS

टिळकनगरमध्ये फटाक्यांच्या पैशांवरून वाद; एकाचा खून

● **श्रीरामपूर । वीरभूमी–**

तालुक्यातील टिळकनगर परिसरात फटाक्यांच्या पैशांवरून झालेल्या वादाचे पर्यवसान भीषण हल्ल्यात झाले. तलवार, कुऱ्हाड आणि कारचा वापर करून करण्यात आलेल्या हल्ल्यात ५० वर्षीय शफी नवाब पठाण यांचा मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसांनी आठ जणांविरुद्ध खुनासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी मोईनुद्दीन शकील पठाण (वय २३, रा. पंचशील कॉलनी, जामा मस्जिद शेजारी, टिळकनगर) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास सागर राहुल गुंजेकर, आनंद अमर पवार, अमित रविकांत पटारे आणि उमर शेख हे स्विफ्ट डिझायर कारमधून त्यांच्या फटाक्यांच्या दुकानात आले. त्यांनी ८०० रुपयांचे फटाके खरेदी केले. पैसे मागितल्यावर त्यांनी पैसे देण्यास नकार देत फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यावरून फिर्यादीने फटाके परत घेतले. यावेळी आरोपींनी रात्री बघून घेण्याची धमकी दिली. त्यानंतर अमित रावसाहेब कोळगे, मनोज रावण साळवे आणि सिद्धार्थ रेणे यांनीही तेथे येऊन फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. रात्री साडेदहाच्या सुमारास अमित पटारे, मनोज साळवे व सिद्धार्थ रेणे मोटारसायकलवरून, तर अमित कोळगे आणि उमर शेख मोपेडवरून फिर्यादीच्या घरासमोर आले. अमित पटारे याने तलवारीने फिर्यादीवर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी तो चुकवला. आरडाओरडा ऐकून फिर्यादीचे चुलते शफी नवाब पठाण, भाऊ रियान व इतर नातेवाईक बाहेर आले. त्यांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र झटापट करून आरोपी साथीदारांसह पसार झाले. काही वेळातच आरोपी पुन्हा स्विफ्ट डिझायर कारमधून घटनास्थळी आले. सागर गुंजेकर कुऱ्हाड घेऊन खाली उतरला, तर उमर शेख, आनंद पवार आणि अमित पटारे यांनी तलवारी व चाकू फिरवून परिसरात दहशत निर्माण केली. सागर गुंजेकर याच्या सांगण्यावरून अमित पटारे याने फिर्यादीचे चुलते शफी पठाण यांच्या अंगावर भरधाव कार घातली. तसेच त्यांना वाचवण्यासाठी आलेल्या भारत कैलास खंडागळे आणि रियाज शेख यांनाही कारने धडक देत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आरोपींच्या कारची घरासमोर उभ्या असलेल्या एमएच १७ बीटी ४३०१ क्रमांकाच्या रिक्षाला जोरदार धडक बसली. त्यामुळे स्विफ्ट कार पलटी झाली. या हल्ल्यात शफी पठाण, भारत खंडागळे आणि रियाज शेख गंभीर जखमी झाले. तिघांना प्रथम साखर कामगार रुग्णालयात, त्यानंतर पुढील उपचारासाठी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शफी नवाब पठाण यांना मृत घोषित केले. अन्य दोघांवर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०३(१), १०९(१), ११८(२), ३५२, ३५१(३), १८९(२), १८९(४), १९०, १९१(३) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ४ व २५ अन्वये सागर राहुल गुंजेकर, अक्षय राहुल गुंजेकर, आनंद अमर पवार, अमित रविकांत पटारे, अमित रावसाहेब कोळगे, मनोज रावण साळवे, सिद्धार्थ रेणे आणि उमर शेख या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल बळीराम लहाने करीत आहेत.

शेतकरीहित आणि सहकाराशी बांधिलकी कायम

आ. आशुतोष काळे । शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांमध्ये लक्ष्मीपूजन उत्साहात

● **कोपरगाव । वीरभूमी–**



दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांमध्ये लक्ष्मीपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कारखाना व उद्योगसमूहाचे आधारस्तंभ माजी आमदार अशोकराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार आशुतोष काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. चैतालीताई काळे यांच्या हस्ते कारखाना व गौतम सहकारी बँकेत विधिवत लक्ष्मीपूजन करण्यात आले.

आसवनी विभागात कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे व त्यांच्या पत्नी सौ. चंद्रकलाताई कोळपे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीत कार्यकारी संचालक दौलतराव मोरे व त्यांच्या पत्नी सौ. सुनंदाताई मोरे, तर पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार पतसंस्थेत संचालक सुदामराव वाबळे व त्यांच्या पत्नी सौ. शोभाताई वाबळे यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले.

यावेळी आमदार आशुतोष काळे म्हणाले की, कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी घालून दिलेल्या सहकार, शेतकरीहित आणि सामाजिक बांधिलकीच्या आदर्श विचारांवर माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना व संलग्न उद्योगसमूहाची यशस्वी वाटचाल सुरू आहे, ही समाधानाची बाब आहे.

कारखाना आणि संलग्न संस्थांच्या प्रगतीत शेतकरी, सभासद, कामगार आणि कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या विश्वासाच्या बळावरच उद्योगसमूहाने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांचे हित जपत कारखान्याची आर्थिक घडी अधिक मजबूत करण्यासाठी आणि संस्थांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

चालू वर्षी एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम शेती आणि पर्यायाने साखर उद्योगावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील वर्ष आव्हानात्मक ठरू शकते, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी आणि कारखान्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून या संकटावर मात करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

लक्ष्मी मातेच्या कृपेने दुष्काळाचे सावट दूर होऊन बळीराजाच्या जीवनात सुखसमृद्धी यावी आणि सर्वांच्या कष्टांना यश लाभावे, अशी प्रार्थना करून त्यांनी सर्वांना दीपावली, बलिप्रतिपदा (पाडवा) व भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कारखान्याचे उपाध्यक्ष, सर्व संचालक मंडळ, संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हाइस चेअरमन, संचालक, कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर, सेक्रेटरी, अधिकारी, विविध विभागांचे खातेप्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केळवंडी, चिंचपूर पांगुळ परिसरात बिबट्याची दहशत; बैलासह वासरू ठार

● **पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यात पुन्हा एकदा बिबट्याची दहशत वाढली असून, बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटनांमुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. केळवंडी शिवारात बाळासाहेब बापूराव आठरे या शेतकऱ्याचा बैल बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाला आहे.

तर दोन दिवसांपूर्वी चिंचपूर पांगुळ येथे आजिनाथ बडे यांच्या शेतातील तारांच्या कुंपणात शिरून बिबट्याने एका मोठ्या वासरावर हल्ला केला. या हल्ल्यात वासराचा मृत्यू झाला.

दरम्यान, तीन दिवसांपूर्वी तालुक्याच्या सरहद्दीवरील आल्हनवाडीजवळील देवळाली पानाची येथे देविदास टकले या व्यक्तीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आता पशुधनावरही बिबट्याचे हल्ले वाढल्याने तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सतत घडणाऱ्या या घटनांमुळे शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी, पशुपालकांनी तसेच नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन वनविभाग आणि प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नागरिकांनी रात्री-अपरात्री एकट्याने घराबाहेर पडू नये, लहान मुलांना एकटे सोडू नये, शक्यतो समूहानेच शेतात जावे, तसेच जनावरे सुरक्षित गोठ्यात बांधावीत. परिसरात बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाण्याचा किंवा त्याला हुसकावून लावण्याचा प्रयत्न करू नये. तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, केळवंडी येथील घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. संबंधित घटनेचा पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. बिबट्याच्या वाढत्या वावराच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने गस्त वाढवावी, बिबट्याचा बंदोबस्त करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.

देवठाणमध्ये बिअर बारसाठी खोटे कागदपत्र सादर केल्याचा आरोप

बोगस लेटरपॅड व बनावट सह्यांद्वारे ना हरकत दाखला तयार केल्याची तक्रार

● **अकोले । वीरभूमी–**

देवठाण येथे बिअर बार आणि परमिट रूम सुरू करण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर केल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामसभेने यापूर्वीच गावात दारू, जुगार आणि मटका बंद करण्याचा ठराव केलेला असतानाही ठाणगाव (ता. सिन्नर) येथील एका व्यक्तीने उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर आणि उत्पादन शुल्क विभाग, संगमनेर यांच्याकडे बिअर बार व परमिट रूमसाठी प्रस्ताव सादर केला होता.

या संदर्भात उत्पादन शुल्क विभागाचे बीट हवालदार २ नोव्हेंबर रोजी कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात आले होते. त्यावेळी ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला तपासला असता, देवठाण ग्रामपंचायत कार्यालयातून अशी कोणतीही कागदपत्रे दिली नसल्याचे समोर आले. संबंधित व्यक्तीने ग्रामपंचायतीचे लेटरपॅड छापून आणि बनावट सह्या करून ना हरकत दाखला तयार केल्याचे सांगण्यात आले. यासंदर्भात ग्रामसेवक आणि प्रशासक यांनी उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांना पत्र दिले आहे.

संबंधित व्यक्तीने ग्रामसेवक आणि प्रशासक यांचे बनावट शिक्के व लेटरपॅड वापरून खोट्या सह्या केल्याचा आरोप आहे. तसेच उपविभागीय पोलीस कार्यालयातही बनावट ना हरकत दाखला सादर करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

त्यामुळे संबंधित व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी अगस्ती कारखान्याचे संचालक सुधीर शेलके, माजी सरपंच केशव बोडके, सामाजिक कार्यकर्ते महेश सोनवणे, सोसायटीचे माजी चेअरमन जालिंदर बोडके, परसराम शेलके, प्रकाश शेळके, एकनाथ सहाणे, अंकुश काकड, अजय शेलके, किशोर घावटे आणि तुळशीराम कातोरे आदी ग्रामस्थांनी केली आहे.

गावात पुन्हा दारूचे दुकान सुरू करण्याची हिंमत होऊ नये

■ अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाचे अध्यक्ष हेरंब कुलकर्णी यांनी देवठाणच्या सरपंचांना पत्र लिहून ग्रामपंचायतीने संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी लेखी विनंती केली आहे. यामुळे संबंधितांवर जरब बसेल आणि पुन्हा गावात दारूचे दुकान आणण्याची हिंमत कोणी करणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

गरजूंच्या दिवाळीत आनंदाचे दीप उजळविणारा उपक्रम स्तुत्य

डॉ. आर. जी. सय्यद । समस्त मुस्लिम बांधवांकडून दिवाळी किराणा किटचे वाटप

● **पारनेर । वीरभूमी–**

गरजू आणि वंचित घटकांनाही दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, या सामाजिक भावनेतून राबविण्यात आलेला दिवाळी किराणा किट वाटपाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे प्रतिपादन संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आर. जी. सय्यद यांनी केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, देशात दिवसेंदिवस गरिबी आणि आर्थिक वंचिततेचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत समाजातील प्रत्येक घटकाला सणांचा आनंद घेता यावा, यासाठी संपन्न नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. आपल्या आनंदात वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांनाही सहभागी करून घेणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून माणुसकीची खरी ओळख आहे.

सर्व धर्मांतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन असे उपक्रम व्यापक प्रमाणावर राबविल्यास अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात देता येईल. यासाठी जात, धर्म आणि पंथ यांपलीकडे जाऊन सामाजिक एकतेची भावना जोपासणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रमजान ईदच्या परंपरेचा संदर्भ देताना डॉ. सय्यद म्हणाले की, ईदच्या नमाजपूर्वी प्रत्येकाने गरिबांना 'फित्रा' हे दान देण्याची परंपरा आहे. त्यामुळे गरीब कुटुंबांनाही ईदचा सण आनंदाने साजरा करता येतो. याच भावनेतून दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणातही समाजातील गरजू बांधवांना सहभागी करून घेण्याची आवश्यकता आहे.

दिवाळीच्या प्रकाशाने प्रत्येक गरजूच्या घरातही आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची व्याप्ती वाढविणे काळाची गरज आहे. या उपक्रमाचे आयोजन करणाऱ्या समस्त मुस्लिम बांधवांच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच त्यांच्या हातून भविष्यातही अशीच समाजोपयोगी सेवा घडत राहो, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी डॉ. आर. जी. सय्यद, माजी नगराध्यक्ष विजय औटी, हसन राजे, डॉ. सादिक राजे, सखाराम औटी, बबन शेख, डॉ. मुद्सर सय्यद, सलीम राजे, सलीम राजे, नियाज राजे, वसीम राजे, हमजेखा मोमिन, मुनीर सय्यद, बाळासाहेब शेटे, विशाल शेटे, रशीद शेख, लियाकत शेख, अय्याज राजे, आवेज राजे, निहाल सय्यद, अशोक गायकवाड, अन्सार शेख, बबलू राजे आदींसह समस्त मुस्लिम बांधव उपस्थित होते.



आज समाजात माणुसकी, बंधुभाव आणि सामाजिक एकोपा जपण्याची नितांत गरज आहे. याच भावनेतून समस्त मुस्लिम बांधवांनी किराणा किट वाटपाचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत गरजू बांधवांच्या घरातही दिवाळीचा आनंद आणि प्रकाश पोहोचवणे, हा या उपक्रमामागील प्रामाणिक हेतू आहे.

धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकीचे नाते जपणे, शेजारधर्म पाळणे आणि अडचणीच्या काळात एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, हाच सामाजिक धर्म आहे. हा उपक्रम केवळ मदतीचा नसून सामाजिक सलोखा, एकता आणि बंधुभावाचा संदेश देणारा आहे. भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक करण्याची इच्छा असल्याचे पारनेर खादी ग्रामोद्योगचे माजी चेअरमन हसन राजे यांनी सांगितले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

माणुसकीच्या मूल्यांचा संदेश देत पोदार स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

● अहिल्यानगर । वीरभूमी –

पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरचे दहावे वार्षिक स्नेहसंमेलन ३ व ४ नोव्हेंबर रोजी सावेडी येथील मौली सभागृहात उत्साहात पार पडले. दोन दिवस चाललेल्या या सांस्कृतिक सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, संगीत आणि अभिनयातून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. प्राथमिक विभागासाठी 'फेअरी टेल्स – व्हेअर स्टोरीज डान्स, ड्रीम्स फ्लाय अँड मॅजिक कम्स अलाइव्ह', तर माध्यमिक विभागासाठी 'बीइंग ह्युमन – बी द रिझन फॉर समवन टू बिलीव्ह इन गुडनेस' या संकल्पना मांडण्यात आल्या होत्या. ३ नोव्हेंबर रोजी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ विसले आणि जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पोदार मांजरीच्या प्राचार्या मीनल वैद्य, पुनावालाच्या रिंकू अग्रवाल, खोपोलीच्या वैशाली रणसुभे आणि वाकडचे अग्रेल कारव्हॅलो उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सिंड्रेला, स्नो व्हाइट, अलादीन आणि जंगल बुक या परीकथांवर आधारित नृत्य व नाटिका सादर करून रंगमंचावर जादुई विश्व साकारले. ४ नोव्हेंबर रोजी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी लष्करी वाहनांच्या गुणवत्ताहमीचे पर्यवेक्षण करणारे ब्रिगेडियर राजीव चावला व सौ. प्रियंका चावला तसेच शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय पोदार रोहकलचे विशाल जाधव, दौंडच्या स्वाती कणसे, पुणे हबचे जनरल मॅनेजर मनोज काळे, वाघोलीचे मनीष शर्मा, हडपसरचे ए. के. सिंह, तळेगावचे सुधांशू नायक, उंड्रीचे संजीव भारद्वाज, नाशिकचे डॉ. मनोहर महाजन, चाळीसगावचे अजय घोरपडे, शिरूरचे नीरज राय, इगतपुरीचे संदेश खताळ आणि रयत इंग्लिश मीडियम स्कूल, साताऱ्याचे मॅनेजर महेंद्र काटकर उपस्थित होते.

आरोपी नानासाहेब घनवट यांचा दुसरा जामीन अर्जही फेटाळला

● अहिल्यानगर । वीरभूमी –

शेवगाव येथील बहुचर्चित शेअर गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी नानासाहेब हरीभाऊ घनवट यांचा दुसरा जामीन अर्जही जिल्हा न्यायालयाने फेटाळला. शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०५७४/२०२६ अन्वये १२ जुलै २०२६ रोजी संदीप सुभाष शिंदे (रा. हिवरे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यांनी आरोपी नानासाहेब घनवट यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीनुसार, आरोपीने शिंदे यांना शेवगाव येथील 'एन अँड एन असोसिएट्स' या शेअर मार्केट ट्रेडिंग कार्यालयात बोलावून गुंतवणुकीवर दरमहा सहा टक्के परतावा देण्याचे आश्वासन दिले. विश्वास संपादन करून त्यांच्याकडून ३२ लाख रुपये स्वीकारले. मात्र, तीन वर्षे उलटूनही कोणतीही रक्कम परत केली नाही. पैसे मागितल्यानंतर आरोपीने शिवीगाळ करून पैसे देण्यास नकार दिला. तसेच शेवगावमध्ये येऊन भावाकडे पैशांची मागणी केल्यास गाडीखाली घालून ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या फिर्यादीवरून शेवगाव पोलिसांनी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८, ३१६ व ३१६ (१) अन्वये गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान अन्य ठेवीदारांचीही ४४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आल्याने एकूण ७६ लाख रुपये जमा केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी घनवट यांना अटक केली. अटकेनंतर आरोपीने जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने तो फेटाळल्यानंतर आरोपीतर्फे पुन्हा जामीन अर्ज दाखल करण्यात आला. मात्र, न्यायालयाने दुसरा अर्जही फेटाळून लावला. दोन्ही वेळा जिल्हा न्यायालयात मूळ फिर्यादी संदीप शिंदे यांच्यातर्फे ॲड. सतीशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

अकोले पोलिसांची दमदार कामगिरी!

दोन लाखांचे विविध कंपन्यांचे ११ हरवलेले मोबाईल शोधून मूळ मालकांना परत

● अकोले । वीरभूमी–



मोबाईल हरवला की तो पुन्हा मिळण्याची आशा अनेकजण सोडून देतात. मात्र, अकोले पोलिसांनी आपल्या तांत्रिक कौशल्याचा आणि तपास यंत्रणेचा प्रभावी वापर करत नागरिकांचा हरवलेला विश्वास पुन्हा मिळवून दिला आहे. विविध कंपन्यांचे तब्बल ११ हरवलेले मोबाईल शोधून ते मूळ मालकांना परत करण्यात अकोले पोलिसांना यश आले आहे. या मोबाईलची अंदाजे किंमत दोन लाख रुपये असल्याची माहिती आहे.

हरवलेल्या तसेच चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी अकोले पोलिसांकडून तांत्रिक पातळीवर प्रयत्न करण्यात आले. केंद्र सरकारच्या सीईआयआर पोर्टलच्या माध्यमातून हरवलेल्या मोबाईलची माहिती संकलित करून त्यांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. मोबाईलच्या वापराबाबत उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवली. या प्रयत्नांना यश येत विविध कंपन्यांचे ११ मोबाईल हस्तगत करण्यात आले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई करण्यात आली .ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, पोलीस उपअधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे आणि अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलीस हेड कॉन्स्टेबल शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल पवार आणि पोलीस कॉन्स्टेबल पावसे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

यावेळी नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान; पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होताना प्रामुख्याने दिसून आले .कष्टाने कमावलेल्या पैशांतून घेतलेला मोबाईल हरवल्यानंतर नागरिकांना आर्थिक नुकसानासोबतच महत्त्वाच्या माहितीचे नुकसानही सहन करावे लागते. अशा परिस्थितीत अकोले पोलिसांनी शोधून काढलेले मोबाईल पुन्हा मूळ मालकांच्या स्वाधीन केल्याने संबंधित नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

केवळ गुन्ह्यांचा तपासच नव्हे, तर नागरिकांच्या हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती त्यांना परत मिळवून देण्याची जबाबदारीही अकोले पोलिसांनी प्रभावीपणे पार पाडली आहे. तांत्रिक कौशल्य, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि समन्वयाच्या जोरावर करण्यात आलेल्या या कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

केरळसफर अन् बौद्ध गया यात्रेची एकाच व्यासपीठावर माहिती

● अहिल्यानगर । वीरभूमी –

पर्यटन म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे नव्हे, तर निसर्ग, संस्कृती, इतिहास आणि परंपरांचा जवळून अनुभव घेत आयुष्यभरासाठी सुंदर आठवणी निर्माण करण्याचे माध्यम आहे. याच संकल्पनेतून पुणे येथील ट्रिपव्हर्स क्युरेशन या पर्यटन संस्थेच्या वतीने अहिल्यानगरमध्ये विशेष मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत केरळच्या निसर्गरम्य पर्यटन सहलीसह बौद्ध गया येथील आध्यात्मिक यात्रेची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

या बैठकीसाठी ट्रिपव्हर्स क्युरेशनचे संस्थापक भरत जैन पुण्याहून अहिल्यानगर येथे उपस्थित राहणार आहेत. ते नुकत्याच आयोजित केलेल्या केरळ सहलीचे अनुभव, पर्यटनस्थळांची वैशिष्ट्ये, प्रवासाचे नियोजन आणि सहलीशी संबंधित विविध बाबींची माहिती देतील. केरळमधील हिरवीगार वनराई, समुद्रकिनारे, बॅकवॉटर, स्थानिक संस्कृती आणि पर्यटनाच्या वैशिष्ट्यांवरही मार्गदर्शन केले जाणार आहे.

या उपक्रमात मनोरंजनात्मक पर्यटनासोबत भारतीय संस्कृती आणि आध्यात्मिक वारशाची ओळख करून देण्यावरही भर देण्यात आला आहे. त्यानुसार भविष्यात आयोजित करण्यात येणाऱ्या बौद्ध गया यात्रेची माहितीही बैठकीत दिली जाणार आहे. भगवान गौतम बुद्धांच्या जीवनाशी निगडित बौद्ध गया हे जगभरातील बौद्ध अनुयायांसाठी श्रद्धा आणि प्रेरणेचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. महाबोधी मंदिर, बोधिवृक्ष आणि ऐतिहासिक स्थळांच्या माध्यमातून भारतीय आध्यात्मिक परंपरेचा परिचय करून घेण्याची संधी या यात्रेतून मिळणार आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात पर्यटनाकडे केवळ विरंगुळा म्हणून न पाहता कुटुंबीयांसोबत वेळ घालवणे, नवीन संस्कृती समजून घेणे, ऐतिहासिक वारशाची माहिती मिळवणे आणि मानसिक समाधान मिळवणे, अशा व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर केरळची निसर्गसफर आणि बौद्ध गया येथील आध्यात्मिक यात्रा या दोन्ही उपक्रमांची माहिती एकाच ठिकाणी मिळणार असल्याने पर्यटनप्रेमींसाठी ही बैठक उपयुक्त ठरणार आहे.

ही मार्गदर्शन बैठक मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता एन्रिस सयाजी हॉटेल, नगर-मनमाड रोड, कोहिनूर मॉलसमोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. पर्यटनाची आवड असणारे नागरिक, कुटुंबासह सहलीचे नियोजन करणारे तसेच बौद्ध गया यात्रेत सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहून माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन ट्रिपव्हर्स क्युरेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शिवरायांच्या चरणी दीपांजली; शिवप्रेमींनी साजरा केला स्वाभिमानाचा दीपोत्सव

महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याभोवती पणत्यांची रोषणाई



● अहिल्यानगर । वीरभूमी–

दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना दीप अर्पण करून करण्याची परंपरा जपत अहिल्यानगरमध्ये शिवप्रेमींनी अनोखा दीपोत्सव साजरा केला. मराठा समन्वय परिषदेच्या वतीने शनिवारी (दि. ७ नोव्हेंबर) जुने बसस्थानक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याभोवती दीपप्रज्वलन करण्यात आले. पणत्यांच्या प्रकाशाने उजळलेल्या या परिसरात शिवप्रेमींचा उत्साह आणि शिवरायांप्रती असलेली श्रद्धा अनुभवायला मिळाली.

'जय भवानी, जय शिवाजी', 'जय जिजाऊ... जय शिवराय', 'जय शंभूराजे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महिला, युवक-युवतींसह मोठ्या संख्येने शिवप्रेमींनी या उपक्रमात सहभागी होत महाराजांच्या चरणी दीपांजली अर्पण केली. पणत्यांच्या प्रकाशात उजळलेला महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि वातावरणात घुमणारा शिवरायांचा जयघोष यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

या दीपोत्सवात मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा लकाताई मुंदडा, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा ड. स्वाती जाधव, लीला अग्रवाल, सुचिता बोरकर, अरुणा गोयल, मेघना मुनोत, निष्ठा सुपेकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे म्हणाल्या की, दिवाळी हा बळीराजाच्या कष्टाचा आणि समृद्धीचा उत्सव आहे. मात्र, रयतेचे राज्य निर्माण करून स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण केल्याशिवाय हा आनंदोत्सव पूर्ण होऊ शकत नाही.

त्यामुळे दिवाळीतील पहिला दिवा महाराजांच्या चरणी अर्पण करून त्यांच्या विचारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे. हा केवळ दीपोत्सव नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा उत्सव असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

समता योग भवनमध्ये दीपोत्सवाचा प्रकाशोत्सव

सप्तचक्रांच्या आकर्षक मांडणीतून योग आणि आरोग्याचा संदेश

● कोपरगाव । वीरभूमी–

दीपावलीच्या मंगलमय पहाटे प्रकाशोत्सव आणि योगसाधनेचा आरोग्यदायी संदेश यांचा अनोखा संगम समता योग भवन येथे अनुभवायला मिळाला. समता योग मंदिराचे मार्गदर्शक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, योग प्रशिक्षक अभिजित शहा व सतीश गुजराथी यांच्या अभिनव संकल्पनेतून आयोजित दीपोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. यावेळी मानवी शरीरातील सप्तचक्रांचे महत्त्व दिव्यांच्या आकर्षक मांडणीतून अधोरेखित करण्यात आले.

'तमसो मा ज्योतिर्गमय' या उक्तीप्रमाणे अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश दीपोत्सवातून देण्यात आला. ज्याप्रमाणे दीपज्योती अंधार दूर करून प्रकाश निर्माण करते, त्याचप्रमाणे नियमित योगाभ्यासामुळे शरीरातील आळस व नकारात्मकता दूर होऊन निरोगी आणि सकारात्मक जीवन जगण्याची प्रेरणा मिळते, हा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला.

दीपोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे मानवी शरीरातील सप्तचक्रांचे महत्त्व दिव्यांच्या माध्यमातून साकारलेली देखणी मांडणी. या अनोख्या संकल्पनेमुळे उपस्थितांना योगशास्त्रातील चक्रांचे महत्त्व जाणून घेण्याची संधी मिळाली.

यावेळी प्रसिद्ध योगगुरू अभिजित शहा यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यातील महत्त्व विशद करून नियमित योगसाधनेचे फायदे सांगितले. उदयोन्मुख तरुण योगपटू प्रज्वल ढाकणे याने अवघड व क्लिष्ट योगासनांची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

या सोहळ्यास शैलेंद्र कुलकर्णी, राजाभाऊ जगताप, कमलाकर भालेराव, मेहेत्रे नाना, घेमुड साहेब, नंदकिशोर जाधव, राम जावरे सर, अनिल इंगळे, रवींद्र गाडेकर, संतोष जाधव यांच्यासह इतर योगसाधक उपस्थित होते.

महिला योगशिक्षिका नाजुकाताई गव्हाळे, क्षमा कुलकर्णी, मंदाताई घनघाव, सौ. पाटोळे, सौ. जाधव, सौ. शहा, सौ. कहांडळ, वैद्य, कुमारी संस्कृती शहा, कुमारी समृद्धी गुजराथी यांच्यासह महिला



योगसाधकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

दीपावलीच्या पहाटे योगसाधना, दीपप्रज्वलन आणि आरोग्यविषयक विचारांची सांगड घालत नियमित योगासने करण्याचा व आरोग्यसंपन्न जीवन जगण्याचा संकल्प करून दीपोत्सवाची उत्साहात सांगता झाली.

वीरभूमी

वंचित बहुजन आघाडीची 'काळी दिवाळी'!

चटणी-भाकर खाऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचा निषेध । सरसकट कर्जमाफी आणि हेक्टरी एक लाख नुकसानभरपाईची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'काळी दिवाळी' आंदोलन करण्यात आले. केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. आंदोलकांनी चटणी-भाकर खाऊन बळीराजा आणि कष्टकरी बांधवांच्या वेदनांशी एकरूप होत अनोख्या पद्धतीने काळी दिवाळी साजरी केली. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांच्या नावे जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, २०२६ च्या मान्सून हंगामात पावसात सुमारे १८ ते १९ टक्के तूट राहिल्याने राज्यातील ३५८ पैकी ३०४ ते ३०५ तालुके म्हणजेच सुमारे ८५ टक्के भाग दुष्काळाच्या छायेत आला आहे. मराठवाड्यात ३८ टक्के, तर विदर्भात २७ टक्के पावसाची तूट नोंदविण्यात आली आहे. अहिल्यानगर, यवतमाळ, जळगाव, नांदेड, अमरावती, सोलापूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

धरणांतील पाणीसाठ्यात मागील वर्षाच्या तुलनेत २३ टक्क्यांनी घट झाली असून भूजल पातळीही खालावली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सोयाबीन, कापूस, तूर आणि मका यांसारखी प्रमुख पिके वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याची वेळ आल्याने उद्योगधंद्यांवरही परिणाम होऊन मजूर वर्गाच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याऐवजी सरकारने केवळ पाच हजार रुपयांची तुटपुंजी मदत आणि काही नाममात्र सवलती जाहीर केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. ही मदतही अद्याप अनेक गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. विद्यार्थ्यांचे केवळ परीक्षा शुल्क माफ करून सरकारने जबाबदारी झटकली असून बांधकाम कामगार, पेंटर, कंत्राटी मजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. पालावरील आदिवासी, भटके-विमुक्त, अनाथ, एकल महिला, विधवा, निराधार, दिव्यांग तसेच दलित-आदिवासी समाजातील घटकांनाही या संकटाचा मोठा फटका बसत असल्याचे नमूद करण्यात आले.

दुष्काळग्रस्तांना तातडीने दिलासा देण्यासाठी कुंभमेळ्यासाठी राखीव ठेवलेला ३५ हजार कोटी रुपयांचा निधी दुष्काळ निवारणासाठी खर्च करावा, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, बाधित पिकांसाठी प्रतिहेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची मोफत व नियमित व्यवस्था करावी, दलित-आदिवासी वस्त्यांसाठी स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना मंजूर कराव्यात, सहकारी संस्था, बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली थांबविण्यासाठी शासन निर्णय काढावा, तसेच ग्रामीण व शहरी भागातील सर्व कर रद्द करावेत, अशा मागण्या करण्यात आल्या.

विद्यार्थी, बांधकाम कामगार, पेंटर, कंत्राटी मजूर, तृतीयपंथी, अनाथ, एकल महिला, विधवा, निराधार, भटके-विमुक्त आणि स्थलांतरित



कामगारांसाठी विशेष आर्थिक मदत व सुरक्षा योजना राबविण्याची मागणीही करण्यात आली.

दुष्काळग्रस्तांच्या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. पुढील काळात अन्न-पाण्याची व्यवस्था झाली नाही, तर भाजपचे मंत्री, खासदार, आमदार आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या घरांवर 'बिऱ्हाड मोर्चे' काढण्यात येतील. तसेच जनतेच्या पिण्याच्या पाण्याची आणि अन्नाची व्यवस्था करण्यास त्यांना बाध्य केले जाईल, असा इशाराही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जामखेड नगरसेविका संगीताताई भालेराव, सूरज भालेराव, पोपट शेटे, चंद्रकांत पातारे, राजीव भिंगारदिवे, हनीफ शेख, मनोज साळवे, दीपक साहेबराव चांदणे, जिल्हा सल्लागार शिरसाठ जे. डी., प्रा. दादा समुद्र आणि संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप यादव यांनी जाहीर पाठिंबा देत सहभाग नोंदविला.

याशिवाय शाहूराव खंडागळे, बन्नू शेख, संतोष जैंजाळ, गणेश साहेबराव फाजगे, रविंद्र जैंजाळ, अविनाश धनवे, अरुण झांबरे, प्रज्योत शिर्के, सुशील साळवे, चंद्रकांत नेटके, प्रतिक जाधव, संदीप पवार, संदिप ठोंबे, योगेश शिंगाडे, रविंद्र शिरसाठ, देविदास भालेराव, पृथ्वीराज काळे, प्रशांत शिंदे, रंजित मेघडबर, अतिश पारवे, राजन मेघदंबर, प्रेम जाधव, पातारे विकास, किशोर शिंदे, गणेश सूर्यवंशी, यश शिंदे, प्रथमेश शिंदे, पार्थ शिंदे, संदेश शिंदे, साहिल शेख, सौरभ सातपुते, सुनिल ठोकळ, सार्थक भराटे, अनुराज आंधळे, सिद्धार्थ बारगजे, ईश्वर बारसकर, पप्पू चव्हाण, पोपटराव थोरात यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि कष्टकरी बांधव उपस्थित होते.

बोल फाउंडेशनचा १५० कुटुंबांसोबत दिवाळी आनंदोत्सव

भिंगारमधील गरजू महिलांना नवीन साड्या, तर कुटुंबांना मिठाईचे वाटप

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सामाजिक बांधिलकी जपत 'ब्रेड ऑफ लाईफ' व बोल फाउंडेशनच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीमध्ये दिवाळी आनंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत १५० हून अधिक कुटुंबांना दिवाळी मिठाईचे पुडे, तर १५० हून अधिक महिलांना नवीन साड्यांचे वाटप करण्यात आले. सणाचा आनंद समाजातील गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी दिवाळी मिठाईच्या पुड्यांचे वाटप श्री. अरविंद कोथापल्ली यांच्या टर्न अराउंड ग्लोबल सर्व्हिसेस या संस्थेच्या सौजन्याने करण्यात आले. तसेच भिंगार येथील रहिवासी श्री. दिलीप लालचंद मुनोत यांच्या सौजन्याने इंदिरानगर सेवावस्तीतील महिलांना नवीन साड्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बोल फाउंडेशनचे चेअरमन जोसेफ पाटोळे यांनी दिवाळीचा आनंद समाजातील गरीब, गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचला



पाहिजे, असे सांगितले. सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाशी आपुलकीचे आणि मानवतेचे नाते जोडले गेले पाहिजे. याच सामाजिक भावनेतून बोल फाउंडेशन सातत्याने विविध उपक्रम राबविण्यासाठी कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बोल फाउंडेशनच्या सचिव शोभा पाटोळे, उपाध्यक्ष अमित पाटोळे, श्रद्धा पाटोळे, काव्या पाटोळे व आरुष पाटोळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना मिठाईचे पुडे व साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच स्वयंसेवक अनिकेत पाटोळे, आरती पाटोळे, अंकिता पाटोळे, नीतीन पाटोळे आणि इतर स्वयंसेवकांच्या माध्यमातून उर्वरित गरजू कुटुंबांपर्यंतही दिवाळी भेट पोहोचविण्यात आली.

यावेळी इंदिरानगर सेवावस्तीतील स्वयंसेवक भाऊसाहेब लक्ष्मण गवळी ऊर्फ अण्णाभाऊ गवळी यांनी बोल फाउंडेशन, देणगीदार आणि उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच सेवावस्तीतील सेविका आरती सदलापुरकर यांनीही फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

हा दिवाळी आनंदोत्सव यशस्वी करण्यासाठी नंदा रॉय, सीमा क्षीरसागर, मोनिका वैराळ, वर्षा घोरपडे, सुनीता गवळी, आरती सदलापुरकर, रुपाली भारत ठोकळ, सोनाली उमाप, धनंजय घोरपडे, विनोद उमाप आणि अण्णाभाऊ गवळी यांच्यासह बोल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

सण केवळ स्वतःच्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू कुटुंबांसोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दिवाळीनिमित्त मिळालेल्या या भेटींमुळे इंदिरानगर सेवावस्तीतील कुटुंबांच्या सणाचा आनंद द्विगुणित झाला.

कोतूळ जिल्हा परिषद शाळेत २००६ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

संगीत खुर्ची, गाणी, उखाणे आणि स्नेहभोजनातून जुन्या आठवणींना उजाळा

● **अकोले । वीरभूमी–**

वीस वर्षांपूर्वी शाळेतून बाहेर पडलेले विद्यार्थी पुन्हा एकदा आपल्या प्राथमिक शाळेत एकत्र आले. संगीत खुर्ची, गाणी, उखाणे आणि स्नेहभोजनासह सुख-दुःखाच्या गप्पांमध्ये रमलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. बालपणीचे हे विद्यार्थी आज शेती, नोकरी आणि उद्योग-व्यवसायात जबाबदाऱ्या सांभाळणारे नागरिक बनले आहेत. मात्र, या स्नेहमेळाव्यात ते पुन्हा बालपणाच्या आठवणींत रमले.

अकोले तालुक्यातील कोतूळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या २००६ च्या बॅचचा स्नेहमेळावा शाळेत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बुधाजी कचरे होते.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी सविता कचरे, शिक्षक



बँकेचे माजी चेअरमन सुनील बनोटे, प्रा. मच्छिंद्र देशमुख, मोहन वाल्हेकर, कोंडाजी देशमुख, पत्रकार सुनील गीते, साळवे मॅडम, कडलग मॅडम आणि क्षीरसागर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी प्रशिक सोनवणे, जिशान शेख, जैद पठाण, स्वप्निल कोते, सार्थक गीते, चेतन वाघमारे, संकेत पोखरकर, राजश्री देशमुख, तृप्ती देशमुख, प्रशांत गोडे, अभिषेक मेंगाळ आणि वैभव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले, तर जैद पठाण यांनी आभार मानले.

अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. शाळा आणि गुरुजनांप्रती आदर व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव एकमेकांसोबत शेअर केले.

२००६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी कोतूळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच शैक्षणिक साहित्याची मदत करण्याचा निर्णय घेतला.

अस्पायर फाउंडेशनच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी मोहन वाल्हेकर यांचा, तसेच २००६ च्या बॅचमधील अभिषेक मेंगाळ, स्वप्निल बोऱ्हाडे आणि दर्शन बोऱ्हाडे हे शासकीय सेवेत रुजू झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

पद्मशाली युवाशक्तीचा माणुसकीचा दीपोत्सव!

सात भागांतील १०० वृद्ध व गरजूंना दिवाळी फराळाचे वाटप

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

दिवाळी म्हणजे आनंदाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा उत्सव! या सणानिमित्त प्रत्येक घरात नवीन कपड्यांची खरेदी, मिठाई व फराळाची तयारी आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठींची लगबग सुरू असते. मात्र, समाजात आजही अनेक वंचित, निराधार आणि वृद्ध बांधव आहेत, ज्यांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद वाटून घेणारे कुणी नसते. अशा व्यक्तींच्या आयुष्यातही सणाचा गोडवा आणि आनंद फुलावा, या उदात्त भावनेतून पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टच्या वतीने दिवाळीनिमित्त फराळ वाटपाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

दिवाळीच्या दिवशी सकाळी ठीक ९ वाजता पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टचे युवक फराळाची पाकिटे घेऊन नित्यसेवा, पद्मानगर, श्रमिकनगर, तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजीनगर आणि स्टेशन रोड या सात भागांतील वंचित व वृद्ध व्यक्तींच्या घरी पोहोचले. या उपक्रमांतर्गत एकूण १०० वृद्ध व गरजू व्यक्तींना फराळाचे वाटप करण्यात आले. केवळ फराळाचे वाटप न करता त्यांची आस्थेने विचारपूस करून दिवाळीच्या शुभेच्छा देत आपुलकीचा स्नेहबंध जपण्यात आला.

विशेष म्हणजे, गेल्या ११ वर्षांपासून पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टने ही सेवापरंपरा अखंडितपणे जपली आहे. याविषयी माहिती देताना श्रीनिवास इप्पलपेल्ली यांनी सांगितले की, समाजातील प्रत्येक घटकाला दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, या भावनेतून दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो.

फराळ वाटप करताना छायाचित्रे काढण्याबाबत काही जणांकडून संमिश्र मते व्यक्त केली जातात. गरजू व्यक्तींचा स्वाभिमान जपणे निश्चितच महत्त्वाचे आहे. मात्र, या उपक्रमाचे छायाचित्रण करण्यामागे प्रसिद्धी मिळविण्याचा किंवा स्वतःचे मोठेपण सिद्ध करण्याचा कोणताही हेतू नाही. समाजातील इतर सेवाभावी संस्था, युवक मंडळे आणि दानशूर व्यक्तींनीही अशा उपक्रमांची प्रेरणा घेऊन वंचितांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, हाच यामागील उद्देश आहे. एखाद्या चांगल्या कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचल्यास त्यातून अनेकांना प्रेरणा मिळून मदतीचे आणखी हात पुढे येऊ शकतात. प्रसिद्धीसाठी नव्हे, तर प्रेरणेचा दीप प्रज्वलित करण्यासाठी हा उपक्रम समाजासमोर मांडला जात आहे.

या उपक्रमामुळे भारावून गेलेल्या वृद्ध महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, दरवर्षी दिवाळीच्या दिवशी पद्मशाली युवाशक्तीचे युवक आमच्या घरी येऊन फराळ देतात आणि शुभेच्छा देतात. त्यामुळे जणू आमच्या माहेरच्या माणसांनीच दिवाळीचा प्रेमळ निरोप आमच्या घरापर्यंत पोहोचविला आहे, अशी भावना मनात निर्माण होते. त्यांच्या या भावपूर्ण प्रतिक्रियेतून उपक्रमाचे खरे समाधान आणि सार्थकता अधोरेखित झाली.

आजच्या धावपळीच्या जीवनात स्वतःचा आनंद साजरा करताना दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. एखाद्याला दिलेले फराळाचे पाकीट



कदाचित आर्थिकदृष्ट्या छोटे असेल; परंतु त्यामागील प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचे मोल अमूल्य आहे. दिव्यांच्या प्रकाशापेक्षा माणुसकीचा प्रकाश अधिक तेजस्वी असतो, याची प्रचिती या उपक्रमातून आली.

या सेवाभावी उपक्रमात पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टचे योगेश म्याकल, सुमित इप्पलपेल्ली, संजय चिप्पा, प्रवीण कट्टा, सतीश चिंता, अजय म्याना, दीपक गुंडू, श्रीनिवास इप्पलपेल्ली, विनोद म्याना, शुभम बोल्ली, योगेश ताटी, ओम कुरापट्टी, सागर बोगा, सागर आरकल, सागर मेहसुनी, विराज म्याना आणि वेदांत म्याना यांनी सक्रिय सहभाग घेतला.